

कोल्हापूर : कमला महाविद्यालयात ग्रंथालय सप्ताहानिमित्त आयोजित व्याख्यानात बोलताना मनीषा शेणई.

# कमला महाविद्यालयात व्याख्यान

कोल्हापूर, ता. २४ : कमला महाविद्यालयात 'वाचनसंस्कृती वृद्धिंगत करण्यामधील ग्रंथालयांची भूमिका' यावर करवीर नगर वाचन मंदिरच्या ग्रंथपाल मनीषा शेणई यांचे व्याख्यान झाले. ताराराणी विद्यापीठाचे सचिव प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील अध्यक्षस्थानी होते. सौ. शेणई म्हणाल्या, ''वाचनामुळे विद्यार्थ्यांतील सुप्त कलागुणांना चालना मिळते. त्यांचे व्यक्तिमत्त्व प्रगल्भ होते. ग्रंथ वाचनाने आचारविचारांत आमूलाग्र बदल होतो. विचारात चौफेरता येते. आत्मिक सुख मिळते.'' प्राचार्य डॉ. जे. बी. पाटील म्हणाले, ''विद्यार्थ्यांनी पुस्तके वाचून ज्ञानसमृद्ध झाले पाहिजे.'' ग्रंथपाल उर्मिला कदम यांनी आयोजन केले. प्रा. डॉ. नीता धुमाळ यांनी प्रास्ताविक केले.